**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
*Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com*
UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL-5/25

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा अभ्यास (मुख्याध्यापकांच्या दृष्टीकोनातून)

***गुणवंत सोनोने*, Ph. D.**

***Abstract***

प्रस्तुत संशोधनाचे उद्देश 1) अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शोध घेणे *2)* अनु. जाती व जमातीतील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, निर्धारित करण्यात आले. आणि *1)* अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो. *2)* भावनिक परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होतो गृहीतके निश्चित करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधन शाळेसी संबंधित असल्याने शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा उपयोग न्यादर्श निवडीकरिता करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाकरिता यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील 20 मुख्याध्यापकांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधक निर्मित मुलाखत प्रारूपानुसार मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेण्यात येवून माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता शेकडेवारी सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला. त्याआधारे पुढील निष्कर्ष मांडण्यात आले. 1) भावनिकदृष्टया परिपक्व नसलेल्या विद्यार्थ्याचा त्यांच्या वर्तनावर विपरीत परिणाम होतो. भावनिकदृष्टया परिपक्व नसलेल्या विद्यार्थ्यात मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आढळून आले. 2) शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळून आले. 3) शहरी व ग्रामीण भागात अनु. जातीतील विद्यार्थ्यामध्ये भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळून आले. 4) कौटुंबिक वातावरणाचा अभाव, भावनिक दखल न घेणे, सामाजिकीकरणाचा अभाव, भावनिक दमन, सामाजिक-आर्थिक स्तर इ. कारणे भावनिक अपरिपक्वतता अधिक असण्याची असू शकतात. 5) अनु. जाती व अनु.जमातीतील विद्यार्थ्यापैकी अनु. जातीतील विद्यार्थ्यांत भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळले. 6) अनु. जाती व अनु.जमातीतील अपरिपक्वतेत मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आढळले. 7) ग्रामीण भागातील शिक्षणाचा कमी प्रसार, स्त्रियाबद्दलचा दृष्टिकोन, कुटुंब, शाळा

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

व समाजातील वातावरण इ. घटकाचा प्रभाव मुलींच्या भावनिक परिपक्वतेवर पडतो 8) भावनिकदृष्टया परिपक्व नसलेले विद्यार्थी भावनिकदृष्टया अस्थिर असतात असे मोठया प्रमाणावर दिसून आले. 9) कौटुंबिक वातावरण, शैक्षणिक सुविधांचा अभाव, आर्थिक-सामाजिक परिस्थिती, सभोवतालचा परिसर, अंधश्रद्धा वयोमर्यादा, शैक्षणिक वातावरण, सामाजिक-सांस्कृतिक घटक, अशिक्षीतपणा, त्रयस्थपणाची वागणूक, कुपोषण, असंस्कृतपणा इ. घटक भावनिक अपरिपक्वतेस कारणीभूत ठरु शकते. 10) अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्याच्या भावनिक अपरिपक्वतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादन, शालेय समायोजन व भावी जीवनावर परिणाम होतो असे दिसून आले. 11) अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याची भावनिक परिपक्वता, शालेय वातावरणात विकसीत होऊ शकते असे मुख्याध्यापकांना वाटत असले तरी शालेय शिक्षक मार्गदर्शन करीत नाही असे बहुतांश मुख्याध्यापकाने मत व्यक्त केले. 12) मुख्याध्यापक शिक्षकांचा सहकार्य दृष्टिकोन, विविध उपक्रमाचे आयोजन, व्यक्तिमत्व विकासाकरिता उपक्रम, शाळेत राबविल्यास विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता विकसित करता येते. 13) विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता मुख्याध्यापकाद्वारा खालील प्रयत्न केले जातात असे मत व्यक्त केले - प्रसंगानुरुन योग्य मार्गदर्शन, शैक्षणिक वातावरण निर्मिती, आर्थिक मदत, स्वत:चे शुद्ध आचरण, शिक्षकाकडून माहिती संकलन, शिक्षक-पालक सभेचे आयोजन, समायोजनाकडे लक्ष देणे, शैक्षणिक चित्रपट पाहण्यास प्रेरणा देणे, आदर्श व्यक्तिबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यात प्रेरणा व स्फुर्ती निर्माण करणे, खेळ, क्रीडा, मनोरंजन, शैक्षणिक सहल, स्नेहसंमेलन यात सहभाग घेण्यात प्रोत्साहन देणे इ.

**पारिभाषिक शब्द :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ग्रामीण, शहरी, विद्यार्थी, भावना, परिपक्वता, भावनिक परिपक्वता.

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना :**

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय सर्वमान्य झाले आहे. वैचारिक, बौद्धिक, मानसिक, नैतिक, शारीरिक, कलात्मक, भावनिक असा सर्व प्रकारचा विकास ! विकासाकरिता परिपक्वतेचे महत्व अनन्यसाधारण आहे. परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, समायोजन, व्यक्तिमत्व विकासावर परिणाम होतो. कौमार्यावस्थेच्या काळात अनेक शरीर-मानस परिवर्तनाचा भावनिक परिपक्वतेच्या विकासावर प्रभाव पडतो. अनु. जाती व

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक, पार्श्वभूमिचा प्रभाव त्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या विकासावर होतो.

**भावनांचा अर्थ (Meaning of Emotion) -**

गोडार्नच्या मते, 'भावना क्रियांचे उत्तेजक आहे, पण भावनेत फक्त उत्तेजना नसते तर आणखीही काही प्रक्रिया असतात.'

बेरोन, बर्न व कैन्टोविजच्या मते, 'भावनेचा संबंध एका अशा आत्मनिष्ठ भावनेशी / भावनिक अवस्थेशी असतो. ज्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण वर्तनही घडते.'

आर्थर टी जर्सिल्ड के अनुसार, 'संवेग शब्द किसी भी प्रकार से आवेश में आने, भडक उठने अथवा उत्तेजित होणे की दशा को सुचीत करता है ।'

**परिपक्वतेचा अर्थ (Meaning of Maturaty) –**

हरलॉक ( 1981) च्या मते, ' व्यक्तीच्या आनुवंशिक गुणाचे यथाकाल प्रगटीकरण होणे हे परिपक्वन होय.'

मॅकॅडलेस (Macandless 1961) च्या मते, 'कालपरत्वे किंवा वयानुसार व्यक्तीचा विकास होत जाणे म्हणजे परीपक्वन होय.'

**भावनिक परिपक्वता (Emotional Maturaty) -**

"An Adult level of emotional control and expression as opposed to children emotional behavior." - Encyclopedic Dictionary of psychology

"भावनांना योग्यप्रकारे वाव देवून त्यांना योग्य प्रमाणात प्रदर्शित करणे, यालाच भावनिक परिपक्वता म्हणतात." "आयुष्यातील कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची भावनिक सिद्धता म्हणजे भावनीक परिपक्वता होय."

**अनुसूचीत जाती -**

ब्रिटीश संसदेने भारतीय शासन विषयक इ.स. 1935 चा जो कायदा संमत केला, त्यात 'अनुसूचित जाती' हा शब्दप्रयोग प्रथम वापरण्यात आला. भारतीय घटनेच्या कलम 341 नुसार, "ज्या

जाती, वंश वा जनजाती अथवा जाती याचे भाग अथवा त्यातील गट यांचा अनुसूचित जाती म्हणून उल्लेख केला असेल, त्याच सामाजिक गटांना 'अनुसूचित जाती' असे मानले जाईल."

**अनुसूचीत जमाती -**

" भारतीय राज्यघटनेच्या कलम 342 (1) नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती' असे संबोधले जाते. यात सर्वसाधारणपणे एकाकी, डोंगरावर व जंगलात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवन पद्धतीचा जवळजवळ परिचय होवू शकला नाही अशांचा समावेश आहे. गिरीजन व आदिवासी अशा नावानेही ते ओळखले जातात. महाराष्ट्रातील हलबा, वारली, गोंड अशी या ठळक गटाची नावे आहेत.

**संशोधन विषयाची गरज व महत्व -**

शिक्षणाद्वारे व्यक्तिवर सुसंस्कार होऊन व्यक्तिच्या भावनांचे सन्मार्गीकरण व्हावयास हवे. मानवी जीवनाचे वस्त्र विविध भावना, कल्पना, विचारांच्या विविधरंगी धाग्यांनी विणलेले आहे 'पक्वता' ही नैसर्गिक बाब आहे. ती आपल्या इच्छेनुसार साध्य करून घेता येण्याची वस्तु नाही. या संबंधात डॉ. आरनॉल्ड गिझेल ( Dr.Arnold Gesell) यांनी जुळया मुलांवर जो प्रयोग केला तो मार्गदर्शक आहे. या प्रयोगावरून शारीरिक परिपक्वतेचा अध्ययनावर परिणाम होतो हे स्पष्ट होते'. अनु. जाती व जमाती हा समाजघटक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, मानसिक, भावनिकदृष्टया बऱ्याच काळापर्यंत वंचित होता. अनु. जाती व जमातीतील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता तुलनात्मकदृष्टया कमी असल्याने त्यांचा शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो. ग्रामीण व शहरी भागातील वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेवर परिणाम होतो. या विविध प्रश्नांचे शास्त्रीय उत्तर शोधण्याच्या गरजेतून संशोधन विषयाची निवड करण्यात आली.

विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक यांना भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे. भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता कौटुंबिक, सामाजिक, शालेय वातावरण पोषक बनविण्याकरिता उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता कोणकोणते उपक्रम राबवावे याकरिता उपयुक्त ठरणार

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आहे. तात्पर्य, प्रस्तुत संशोधन मानसशास्त्रीय, सामाजिक, शैक्षणिक व भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता महत्वपूर्ण ठरेल, असे संशोधकाचे प्रामाणिक मत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये -**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली.

i. अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शोध घेणे.

ii. अनु. जाती व जमातीतील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, निर्धारित करण्यात आले.

**गृहीतके -**

1. अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो.

2. भावनिक परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होतो.

**संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा -**

प्रस्तुत संशोधनाकरिता संबंधित साहित्याचा व संशोधकांच्या 24 पूर्व संशोधनाचा आढावा घेण्यात आला.

**संशोधन पद्धतीची निवड -**

प्रस्तुत संशोधन यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु.जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा अभ्यास मुख्याध्यापकांच्या दृष्टीकोनातून करावयाचा असल्यामुळे मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेवून माहिती संकलन करण्यात आली. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा ग्रामीण व शहरी भागाच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे ही समस्या शालेय स्तरावरील असून याबाबत सद्यास्थिती जाणून घ्यावयाची असल्यामुळे शालेय/ विद्यालय सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**न्यादर्श -**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

प्रस्तुत संशोधनासाठी यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, नेर, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड, आर्णी, महागांव, घाटंजी, कळंब, बाभूळगाव, राळेगांव, पांढरकवडा, वणी, मारेगांव, झरी जामणी या 16 तालुक्यांपैकी 10 तालुक्याची निवड करण्यात आली. या 10 तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातून एका ग्रामीण व एका शहरी शाळेची निवड करण्यात आली. ग्रामीण भागातून 10 शाळा व शहरी भागातून 10 शाळाची निवड करण्यात आली. 10 तालुक्यातून उच्च प्राथमिक शाळेतील शैक्षणिक सत्र 2007-2008 मधील कार्यरत मुख्याध्यापकांची निवड करण्यात आली.

**संशोधनाची साधने -**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनाकरिता मुख्याध्यापकांच्या मुलाखतीचा उपयोग करण्यात आला.

**माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन -**

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधक निर्मित प्रारुपानुसार मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेवून माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता शेकडेवारी सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला.


**सारणी क्र. 1 शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचे प्रमाण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1 | अनु. जाती | 14 | 70 |
| 2 | अनु. जमाती | 06 | 30 |
| | एकूण | 20 | 100 |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येत की 70% मुख्याध्यापकांच्या मते, शहरी भागामध्ये अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांपैकी अनु. जातीतील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक परिपक्वतेचे प्रमाण जास्त आहे. तर 30% मुख्याध्यापकांच्या मते, अनु. जमातीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, शहरी भागामध्ये अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यापैकी अनु. जातीतील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक परिपक्वतेचे प्रमाण जास्त आहे.





**आलेख क्र. 1 ग्रामीण व शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचे प्रमाण दर्शविणारा आलेख**

वरील आलेखावरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जातीतील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता अधिक असते.

**सारणी क्र. 2 अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना भावनिकदृष्टया परिपक्व बनविण्यास शिक्षकांना शालेय स्तरावर आयोजित विविध उपक्रमात सहभागी करु घेण्यास सांगतात - प्रतिसाद दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1 | होय | 16 | 80 |
| 2 | नाही | 04 | 20 |
| | एकूण | 20 | 100 |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*




**आलेख क्र. 2 अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना भावनिकदृष्टया परिपक्व बनविण्यास शिक्षकांना शालेय स्तरावर आयोजित विविध उपक्रमात सहभागी करुन घेण्यास सांगतात - प्रतिसाद दर्शविणारा आलेख**

वरील सारणी व आलेखावरुन असे निदर्शनास येते की, 80% मुख्याध्यापक हे अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना भावनिकदृष्टया परिपक्व बनविण्यास शालेय स्तरावर आयोजित विविध उपक्रमात सहभागी करुन घेण्यास शिक्षकांना सांगतात.

तर 20% मुख्याध्यापक हे अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना भावनिकदृष्टया परिपक्व बनविण्यास शालेय स्तरावर आयोजित विविध उपक्रमात सहभागी करुन घेण्यास शिक्षकांना सांगत नाही.

वरील सारणी व आलेखावरुन असा निष्कर्ष निघतो की, अधिकांश मुख्याध्यापक हे अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना भावनिकदृष्टया परिपक्व बनविण्यास शालेय स्तरावर आयोजित विविध उपक्रमात सहभागी करुन घेण्यास शिक्षकांना सांगतात.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**निष्कर्ष :**

'अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा अभ्यास (मुख्याध्यापकांच्या दृष्टीकोनातून)', या विषयावरील प्रस्तुत संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडत असतांना उच्च प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांकडून संशोधक निर्मित प्रारुपानुसार मुख्याध्यापकांची मुलाखत घेण्यात आली व पुढील निष्कर्ष मांडण्यात आले.

1. भावनिकदृष्टया परिपक्व नसलेल्या विद्यार्थ्याचा त्यांच्या वर्तनावर विपरीत परिणाम होतो. भावनिकदृष्टया परिपक्व नसलेल्या विद्यार्थ्यात मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आढळून आले.

2. शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळून आले.

3. शहरी व ग्रामीण भागात अनु. जातीतील विद्यार्थ्यामध्ये भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळून आले.

4. कौटुंबिक वातावरणाचा अभाव, भावनिक दखल न घेणे, सामाजिकीकरणाचा अभाव, भावनिक दमन, सामाजिक-आर्थिक स्तर इ. कारणे भावनिक अपरिपक्वतता अधिक असण्याची असू शकतात.

5. अनु. जाती व अनु.जमातीतील विद्यार्थ्यापैकी अनु. जातीतील विद्यार्थ्यांत भावनिक परिपक्वतेचे प्रमाण अधिक आढळले.

6. अनु. जाती व अनु.जमातीतील अपरिपक्वतेत मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आढळले.

7. ग्रामीण भागातील शिक्षणाचा कमी प्रसार, स्त्रियाबद्दलचा दृष्टिकोन, कुटुंब, शाळा व समाजातील वातावरण इ. घटकाचा प्रभाव मुलींच्या भावनिक परिपक्वतेवर पडतो.

8. भावनिकदृष्टया परिपक्व नसलेले विद्यार्थी भावनिकदृष्टया अस्थिर असतात असे मोठया प्रमाणावर दिसून आले.

9. कौटुंबिक वातावरण, शैक्षणिक सुविधांचा अभाव, आर्थिक-सामाजिक परिस्थिती, सभोवतालचा परिसर, अंधश्रद्धा वयोमर्यादा, शैक्षणिक वातावरण, सामाजिक-सांस्कृतिक घटक,

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अशिक्षीतपणा, त्रयस्थपणाची वागणूक, कुपोषण, असंस्कृतपणा इ. घटक भावनिक अपरिपक्वतेस कारणीभूत ठरु शकते.

10. अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्याच्या भावनिक अपरिपक्वतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादन, शालेय समायोजन व भावी जीवनावर परिणाम होतो असे दिसून आले.

11. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याची भावनिक परिपक्वता, शालेय वातावरणात विकसीत होऊ शकते असे मुख्याध्यापकांना वाटत असले तरी शालेय शिक्षक मार्गदर्शन करीत नाही असे बहुतांश मुख्याध्यापकाने मत व्यक्त केले.

12. मुख्याध्यापक शिक्षकांचा सहकार्य दृष्टिकोन, विविध उपक्रमाचे आयोजन, व्यक्तिमत्व विकासाकरिता उपक्रम, शाळेत राबविल्यास विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता विकसित करता येते.

13. विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता मुख्याध्यापकाद्वारा खालील प्रयत्न केले जातात असे मत व्यक्त केले - प्रसंगानुरुन योग्य मार्गदर्शन, शैक्षणिक वातावरण निर्मिती, आर्थिक मदत, स्वत:चे शुद्ध आचरण, शिक्षकाकडून माहिती संकलन, शिक्षक-पालक सभेचे आयोजन, समायोजनाकडे लक्ष देणे, शैक्षणिक चित्रपट पाहण्यास प्रेरणा देणे, आदर्श व्यक्तिबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यात प्रेरणा व स्फुर्ती निर्माण करणे, खेळ, क्रीडा, मनोरंजन, शैक्षणिक सहल, स्नेहसंमेलन यात सहभाग घेण्यात प्रोत्साहन देणे इ.

**संदर्भ ग्रंथ :**

**मराठी -**

आळंदकर जयकुमार ज्ञा., (1975), "अभिनव शैक्षणिक मानसशास्त्र'', पुणे, ठोकळ प्रकाशन.

कडके, शिरगावे, शेंडगे, (ऑक्टो. 2006), "अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया'', कोल्हापूर, फडके प्रकाशन.

कऱ्हाडे बी.एम., (जुलै 2007), "शास्त्रीय संशोधन पद्धती'', नागपुर, पिंपळापुरे एण्ड पब्लिशर्स.

कार्डीले वसंतराव, महाले संजीवनी, (2002) "संशोधनात सांख्यिकीय तंत्राचे उपयोजन'', नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.

गर्गे स. मा. (संपादक), (1986), "भारतीय समाजविज्ञान कोश खंड - 1'', पुणे, कल्पना मुद्रणालय.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

गावंडे एकनाथराव, झोंबाडे वर्षा, (2000), "मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार'', अमरावती, निर्मल प्रकाशन.
घाटोळ रा. ना., (2003), "समाजशास्त्रिय संधोधन तत्वे प पद्धती'', नागपुर, मंगेश प्रकाशन.
घोरमोडे के.यु., घोरमोडे कला, (2008), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे'', नागपुर, विद्या प्रकाशन.
जगताप ह.ना., (1991), "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र'', पुणे, नूतन प्रकाशन.
जोशी अनंत, महाले संजिवनी, (मे 2006), "मुक्त विद्यापीठीय संशोधन'', संशोधन मार्गदर्शन मालिका, पुष्प पहिले, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
पंडीत र.वी., (जून 2007), "शैक्षणिक मानसशास्त्र'', नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन एण्ड पब्लिशर्स.
पारसनिस न.रा., (1992), "प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र'', पुणे, नूतन प्रकाशन.
पोखरापुरकर राजा, (2006), "संशोधनासाठी नमुना निवड'', संशोधन मार्गदर्शक मालिका,पुष्प 11 वे, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
भागवतवार प्र.आ., जोगावार व.वि., बोरुडे रा.र., (1976), "समायोजन मानसशास्त्र'', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन.
भिंताडे वी.रा., (1989), "शैक्षणिक संशोधन पद्धती'', पुणे, नुतन प्रकाशन.
मुळे रा. शं. आणि उमाठे वि.तु., (1998), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे'', नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ.
शेवतेकर-बडवे शारदा, (सप्टें. 2004), "विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र'', नागपूर, विद्या प्रकाशन.
सारंगपाणी मधुसुदन, सारंगपाणी सरोजिनी, (1967), "सामान्य मानसशास्त्र'', पुणे, विद्यामंदिर प्रकाशन.
सोमवंशी अनिल, (2002), "राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण'', अमरावती, बोके प्रकाशन.
सोहनी शं. कृ., (मे 1993), "शैक्षणिक टीपाकोश'', पुणे, हिंदुस्थान मुद्रणालय.

**हिन्दी -**

पाठक पी.डी (2006), "शिक्षा मनोविज्ञान'', नागपूर, पिंपळापरे प्रकाशन एण्ड पब्लिशर्स ।
भटनागर सुरेश, (2001), "शिक्षा मनोविज्ञान'', मरेठ, सूर्या पब्लिकेशन ।
मंगल एस के., (1975), "शिक्षा मनोविज्ञान'', लुधियाना, प्रकाश ब्रदर्स ऐज्युकेशन पब्लिकेशन ।
माथुर एस.एस., (1981-82), "शिक्षा मनोविज्ञान'', आगरा, विनोद पुस्तक मंदिर ।

**इंग्रजी -**

*Best J.W. and Khan J. V., (2000)*, *"Research in Education", Prentice hall of India,* Pvt. *ltd.*
*Bhagi Manjula, Sharma sunita, (1994), "Encyclopedic Dictionary of psychology", New Delhi, Anmol Publication.*
*Buch M.B., "Second survey of Research in Education", (1979), Baroda, Published by Society for Educational Research and Development.*
*Buch M.B., "Third Survey of Research in Education", (1978-1983), New Delhi, Published by N.C.E.R.T.*
*Buch M. B., "Forth survey of Research in Education", Vol. No. 1, (1982-1988), New Delhi, Published by N.C.E.R.T.*
*Buch M. B., "Fifth survey of Research in Education", Vol. No. 1, (1988-1992), New Delhi, Published by N.C.E.R.T.*
*"Six survey of Research in Education', Vol*. No. *1, (1993-2000), New Delhi, Published by N.C.E.R.T.*
*Mangal S.K. (2003), "Advanced Educational Psychology", New Delhi, Prentice Hall of India.*
*Roy B.K. "Census of India", Reginal Devision of India, (Cartographic Analysis Occasional Paper) Series 1, Vol. 12*, ( *1988*) *New Delhi, Maharashtra Govt. Of India.*
*Saksena N.R. Sharma B.K. Mohanthy R.K, "Fundamental of Educational Research", Surya Publication*, Meerut, *2003.*
*Singh Yashvir & Bhargava Mahesh, "Mannual for Emotional* Maturity *scale*", (*1990*), *Agra*, *National Psychology Corporation.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*